HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मुंबई विधानसभेच्या निवडणुका व संयुक्त महाराष्ट्र समिती (विशेषतः सोलापूर जिल्हा १९५२ - १९५७)

**प्रा.डॉ. किशोर नागनाथ जोगदंड**
**इतिहास विभाग प्रमुख, वसुंधरा कला महाविद्यालय,**
**जुळे सोलापूर.**

### प्रस्तावना :



सोलापूर जिल्हयाच्या राजकारणात १९५२ ते १९५७च्या निवडणूकांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः सन १९५२ च्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला मोठया प्रमाणात यश मिळाले तर सन १९५७ च्या निवडणूकीत अपयश आले. महाराष्ट्रात सन १९५७ च्या निवडणूकीत संयुक्त महाराष्ट्र समितीला घवघवीत यश मिळाले. दोन्ही निवडणूकीचा केंद्रबिंदू तुळशीदास जाधव ठरले होते. दोन्ही निवडणूकीत डाव्या पक्षाची एकजूट होती.

सन १९५७ च्या नंतर सोलापूर जिल्हयाचे राजकीय वातावरण बदलले. तुळशीदास जाधव यांच्या कॉंग्रेस प्रवेशामुळे व श्री. शंकरराव मोरे- केशवराव जेधे यांच्या भांडणामुळे शेतकरी कामगार पक्षाची वाताहात झाली. कम्युनिस्ट पक्ष शेतकरी कामगार पक्ष यांच्या विघटनामुळे सोलापूर जिल्हा की जो त्यांचा बालेकिल्ला होता तो बघता-बघता ढासळला व सन १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीचा धुव्वा उडाला. भाई छन्नुसिंग यांच्या हातात कॉंग्रेसची सुत्रे आली व तु.सु.जाधव हे प्रांतिक सेक्रेटरी होते. कॉंग्रेसची शक्ती वाढली व विरोधी पक्षाची वाताहात झाली. त्याबद्दलची माहिती साप्ताहिक कल्पतरु मध्ये पुढीलप्रमाणे दिलेली आहे. "प्रजासमाजवादी पक्षाची शिबीरे किंवा अभ्यास मंडळे या जिल्हयात नव्हती व नाहीत. शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते पुढाऱ्याच्या अभावी कोणतीच तात्विक दिशा दाखवू शकले नाहीत. कम्युनिस्ट पक्ष बार्शी व सोलापूर शहरापुरता मर्यादित होता या पक्षाची अभ्यास मंडळे कित्येक वर्षात झाली नाहीत."[१]

### १९५२ ची मुंबई विधानसभा निवडणुका
### विजयी उमेदवार

बार्शी-माढा मतदारसंघातूनतुळशीदास जाधव यांना २६,१७७ मते प्रतिस्पर्धी गणपतराव साठे यांना १५,०७१ मते पडली. शहर वॉर्ड नंबर २ ते ९ मधील शेतकरी कामगार पक्षाचे हुतात्मा पुत्र शंकरप्पा धनशेट्टी ८,६५५ मते तर प्रतिस्पर्धी कॉंग्रेस उमेदवार ८,३९६ मते मिळाली.शहर वॉर्ड नं. १० ते १६ मधील शे.का.पक्ष पुरस्कृत कम्युनिस्ट उमेदवार भाई गो.द.साने यांनी ८३९६ मते मिळविली. त्यांनी भाई छन्नुसिंग चंदेलेचा पराभव केला तसेच बार्शीचे श्री. नरसिंग तात्या देशमुख, अनगरचे श्री. बाबुराव पाटील, पंढरपूरचे श्री. बाळासाहेब मोरे इत्यादी शे.का.पक्षाच्या उमेदवारानी आपल्या प्रतिस्पर्धी कॉंग्रेस पक्षीय उमेदवाराचा पराभव केला.लोकसभेच्या निवडणुकीत श्री. शंकरराव मोरे आणि शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे श्री. राजभोज हे दोघेही प्रचंड मताने विजयी झाले.

## विजयाची समीक्षा

१९५२ च्या निवडणुकीत जातीयवादही प्रभावी ठरला होता हे आपणाला खालील कोष्टकावरुन स्पष्ट होईल.

| जात | काँग्रेस | | शे.का.प. | | इतर पक्ष | स्वतंत्र | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उभे | आले | उभे | आले | उभे | उभे | उभे | आले |
| ब्राम्हण | ३ | ० | १ | १ | २ | ३ | ८ | १ |
| मराठा-तत्सम | ३ | २ | ९ | ६ | २ | ५ | १९ | ८ |
| लिंगायत | ३ | १ | १ | १ | १ | ३ | ८ | २ |
| रजपूत | १ | - | - | ० | ० | - | १ | - |
| धनगर | १ | १ | - | | - | १ | ३ | १ |
| पदमशाली | १ | - | - | - | - | - | १ | - |
| माळी | १ | - | - | - | - | - | १ | - |
| शिंपी | १ | - | - | - | - | - | १ | - |
| मुसलमान | १ | - | - | - | - | - | १ | - |
| महार | - | - | - | - | ५ | १ | ६ | - |
| ढोर | २ | १ | - | - | - | - | २ | १ |
| चांभार | - | - | - | - | १ | - | १ | १ |
| मातंग | १ | १ | - | - | - | - | १ | १ |
| एकूण | १५ | ६ | १२ | ८ | १२ | १४ | ५३ | १५ |

**संदर्भ**:साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. ६ जानेवारी १९५२[२]

उमेदवार हे सर्व जातीचे होते. जात जन्माची धरली होती. इतर पक्षामध्ये शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी, रामराज्याचा समावेश होता. त्यापैकी शेतकरी कामगार पक्ष चे चांभार समाजातील विजयी झाले. (शे.का.प. च्या युतीमुळे) रामराज्य तर्फे एक महार समाजाचे उमेदवार उभे होते. वरील आकडेवारी विधानसभा व लोकसभेची मिळून आहे. ही वरील वस्तुस्थिती मांडून कल्पतरु कार म्हणतात, "आज वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. निवडणुकीतील उमेदवाराची निवड, मतासाठी याचना आणि खटपट, प्रत्यक्ष मतदान व त्याचबरोबर यशाचे कारण या सर्व गोष्टीत जातीयता नाही म्हटले तर ते धडधडीत असत्य ठरेल.

कल्पतरु आणि आनंदवृत्त नुसार निवडणुकीमध्ये जात ही महत्त्वाची ठरली होती असे दिसते. सन १९५२ ची सोलापूर जिल्हयातील मुंबई विधानसभा निवडणूक ही स्मरणीय अशी ठरली. या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाची कामगिरी सुध्दा चांगली झाली. कारण या निवडणुकीत शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत दहा उमेदवार विजयी ठरले होते. तुळशीदास जाधव, भाऊसाहेब राऊत, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, बाळासाहेब मोरे यांनी निवडणुकीमध्ये सक्षम नेतृत्व दिले होते. या यशामुळे विधिमंडळात तो एक प्रमुख विरोधी पक्ष म्हणून गणला गेला. काँग्रेस सोडून सर्व पक्षांनी संयुक्त महाराष्ट्राचा पुरस्कार केला होता.[३] महाराष्ट्रात डाव्या पक्षांची एकजूट व्हावी म्हणून तुळशीदास जाधव प्रयत्न करीत होते. मुंबईमध्ये त्यांनी स्वतःच्या अध्यक्षतेखाली सात दिवस डाव्या पक्षाची बैठक घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेड्युल्ड कास्ट फेडरेशनशी युती केली आणि राखीव मतदार संघातून श्री. राजभोज यांना निवडून आणण्याची तयारी दर्शविली.

दिनांक ६ जानेवारी १९५२ रोजीच्या आपल्या अंकात साप्ताहिक 'कल्पतरु' ने सोलापूर जिल्हयातील मुंबई विधानसभा निवडणुकीचा अर्थ किंवा त्यांची समीक्षा खालीलप्रमाणे केली होती.

| * | मतदार संघाचे नाव | म्हणजे |
|---|---|---|
| १ | अक्कलकोट | प्रसंगावधान व सौजन्य |
| २ | बार्शी उत्तर | शे.का.प. च्या यशाचा पूर्णेन्दू |
| ३ | माळशिरस | पक्षापेक्षा व्यक्तीच्या दबदबा मोठा होता. |
| ४ | करमाळा | |
| ५ | माढा - मोहोळ | |
| ६ | पंढरपूर | संयुक्त आघाडीचे शहाणपण |

| | | |
|---|---|---|
| ७ | सांगोला | काँग्रेसचे शुध्द यश |
| ८ | सोलापूर शहर व तालुका | स्त्री - दाक्षिण्य |
| ९ | सोलापूर शहर दक्षिण | मजूराच्या आशा |
| १० | सोलापूर शहर उत्तर | एकजूट |
| ११ | माढा-बार्शी | मूर्तिमंत कर्तृत्व |

**संदर्भ**:साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. ६ जानेवारी १९५२[४]

लोकसभा

१) साधारण जागा तु.सु.जाधवाचे स्मारक

२) राखीव जागा शे.का.प. चा प्रभाव

वरील विवेचनावरुन आपणास असे दिसते की शे.का.प च्या प्रचार यंत्रणेमुळे व तुळशीदास जाधवाच्या कर्तृत्वामुळे सन १९५२ च्या निवडणुकीत डाव्या आघाडीला घवघवीत यश प्राप्त झाले तरी महाराष्ट्र संयुक्त चळवळीचा प्रभावही काही अंशी कारणीभूत ठरला होता. याशिवाय ब्राम्हण व ब्राम्हणेत्तरवाद सुध्दा या यशाच्या मागे होता असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

## मिरवणूका व सभा

सोलापूरात तिन्हीही उमेदवाराच्या विजयी मिरवणूका निघाल्या होत्या. या मिरवणुकीसाठी २० ते २५ बैलगाडया होत्या. विजयी उमेदवार शंकरप्पा धनशेट्टी, कॉ. जी.डी.साने, आमदार सत्तार यांच्या मिरवणुका जंगी झाल्या. सौ. निर्मलाराजे भोसले यांची यशस्वी झाल्याबद्दल ११० बैलाच्या गाडीतून मिरवणूक काढण्यात आली.

दिनांक १४ जानेवारी १९५२ रोजी सुभाष चौकात संयुक्त आघाडीची सभा झाली. भाई अंबादास जाधव हे या सभेचे अध्यक्ष होते. यावेळी आमदार जाधव, भाई राऊळ, भाई थिटे, आमदार सत्तार यांनी ही भाषणे केली. जुन्या वारद चाळीत कॉ.सानेचा सत्कार झाला. शंकरप्पा धनशेट्टी यांची साखरपेठ येथे सभा होऊन त्यांनी मतदाराचे आभार मानले. सांगोला येथे भाई राऊळ, अकलूजला मोहिते यांची मिरवणूक व सभा झाली.[५]

## पराभूत उमेदवाराची सभा

त्यावेळी सोलापूरामध्ये पराभूत उमेदवार पराभूत का झालो ? हे सांगण्यासाठी सभा घेत असत. दि. १६ जानेवारी १९५२ रोजी सांयकाळी श्री.वि.रा.पाटील यांनी सुभाष चौकात सभा घेतली. "या निवडणुकीत छन्नुसिंग-अंत्रोळीकराची हुकूमशाही निर्माण झाली. त्या हुकूमशाहीने काडादी व निर्मलाराजे यांना निवडून आणले. निवडणुकीच्या अगोदर दोनच दिवस अनुकूल असलेले वातावरण फिरले व आपण या यशाची आशा सोडली. लोकांनी या हुकूमशाहीपासून सावध राहावे. मला जनतेचा पाठिंबा नाही असे मानण्याचे काही कारण नाही. माझ्याच जातीच्या भगिनी निर्मलाराजे भोसले यांना मते देऊन निवडून आणले, त्याचा मला अभिमान वाटतो."[६] असे पाटील म्हणाले.

पंढरपूरच्या काँग्रेसच्या पराभवाची मीमांसा करताना गोफणे म्हणाले, "ब्राह्मण-ब्राह्मणोत्तरी सबंध, समाज-समाजाच्या पिढीजात वैराचा ब्रह्मराक्षस, मंदिर प्रवेशावरुन रोष, खुद्द बबनरावाचा तुटक स्वभाव, संघटना, शिस्तबध्द व कार्यक्षम नसणे ही पराभवाची कारणे त्यांनी स्पष्ट केली.

## १९५७ ची मुंबई विधानसभा निवडणूक

## निवडणूकीचा प्रचार

कम्युनिस्ट पुढारी कॉ.बी.टी.रणदिवे यांनी ५ फेब्रुवारी रोजी सकाळी भैय्या चौकात व चांदणी चौकात तर ६ फेब्रुवारी या दिवशी विजापूर वेशीत निवडणूकीच्या प्रचार सभा घेतल्या. बार्शीमध्ये पीड चौकात संयुक्त महाराष्ट्र समितीची प्रचार सभा झाली या सभेत कॉ. साने, साथी कुसूरकर, भाई बुरगुटे व शाहीर फाटे इत्यादी नी भाषणे केली.

या अगोदर १ फेब्रुवारी १९५७ ला सुभाष चौकात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या जिल्हयातील उमेदवाराने ओळख करुन देण्यासाठी बाळासाहेब मोरे, जी.के.मलगोंडा, बाबर, नि.त.कांबळे, बुरगुटे, फाटे, सं.पाटील, वि.रा.पाटील, धनशेट्टी हे या सभेत बोलले.

दुसरीकडे कॉग्रेसनेही प्रचार सुरु केला होता. लष्कर, मोदी, सुभाष चौक, विजापूर वेस इ. भागात काँग्रेसच्या प्रचार-सभा झाल्या. माढा या ठिकाणी नामदेवराव जगतापाच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्या सभेत भाई छन्नुसिंग व तु.सु.जाधव यांची भाषणे झाली. यावेळी भाई छन्नुसिंगानी प्रत्येकाच्या घरोघरी जावून काँग्रेसचा संदेश पोहचवा असे कार्यकर्त्यांना सांगितले.

काँग्रेसच्या प्रचाराचा शुभारंभ २८ जानेवारी १९५७ ला अक्कलकोट मधून झाला. त्यावेळी जाजू, निर्मलाराजे भोसले उपस्थित होते.

संयुक्त महाराष्ट्र समितीची पहिली प्रचाराची सभा सुभाष चौकात झाली. सभेचे अध्यक्ष जयसिंगराव पवार होते. यावेळी बार्शीचे अॅड. बुरगुटे, वि.रा.पाटील, आ.साने, शे.का.प. चे प्रमुख रणश्रृगांरे इत्यादींनी सभेस उपस्थित राहून भाषणे केली. पंढरपूर येथे काँग्रेस अंतर्गत दोन गटात एकोपा होऊन निवडणुकीसाठी संघटित प्रयत्नकरण्याचे ठरविले तर कामगार संघटनांनी मिळून संयुक्त महाराष्ट्र समितीचे भाई राऊळ यांना निवडणुकीकरता पाच हजाराची मदत केली आहे.[७]

## काँग्रेसचा प्रचार

काँग्रेसकडून प्रचार धन्यकुमार भुमकर, डॉ.अंत्रोळीकर, निर्मलाराजे, साताराचे बॅ.बाबासाहेब भोसले, धुम्मा वकील, सुलतान साहेब, रंगा वैदय, सौ. गजराबाई चंदेले, इंदिराबाई अंत्रोळीकर, द्वारकाबाई देशपांडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष मामा आ.देवगिरीकर, तायप्पा सोनवणे, विलास शहा, आ.सोनवणे, आ.जगताप, धर्मराव काळे, सुपाते, मुरारजी देसाई, हैद्राबादचे शिक्षणमंत्री श्री.गोपाळराव एकबोटे, बनशेट्टी, बेत वकील, सत्तार, फुलारी, जिरगे, भाई विभुते, अक्कलकोटच्या सौ.इंदिराबाई मायदेव मुंबई राज्याच्या बांधकाम खात्याचे मंत्री मा.नाईक निंबाळकर, राष्ट्रीय गिरणी कामगार संघ, आबासाहेब किल्लेदार, उमेदवार ढवळे, राष्ट्रीय गिरणी कामगार संघाचे अध्यक्ष बाबुराव शितोळे इत्यादी मान्यवरांनी काँग्रेसचा प्रचार केला.[८]

## डाव्याचा प्रचार

संयुक्त महाराष्ट्र समितीचा प्रचार वि.रा.पाटील, चाऊस, वांगी, अबुटे, रामय्या सोमा, जी.डी. साने, बाबा कुसूरकर, मो.वा.दोंदे (मुंबई) कॉ.सरदेसाई, एस.एम.जोशी, राष्ट्रसेवादल, कॉ.नाना पाटील, शंकरराव पाटील प्रजा समाजवादी पक्षाचे, सरचिटणीस बा.न.राजहंस पांडुरंगराव घळसासी, मुंबईचे कम्युनिस्ट कवी कैफी आझमी, शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे नेते, मुकुंदराव आंबेडकर, जयसिंगराव पवार, बाळासाहेब मोरे, शाहीर फाटे, बुरकुटे वकील इत्यादी मान्यवरांनी प्रचार केला.

## १९५७ सालची क्रांतीकारक निवडणूकीचे विश्लेषण

राज्य पुनर्रचनेच्या प्रश्नावरुन मुंबई राज्याच्या निवडणुका गाजल्या. भारतात चौदा भाषिक राज्य झाल्यानंतर फक्त मराठी आणि गुजराती भाषिकांना ते मिळू नये असा प्रश्न निर्माण झाला. फाजल अली कमिशनच्या शिफारशीने केरळ-म्हैसूरची राज्ये निर्माण झाली होती. यावरुन मराठी भाषिकांना हिन लेखले जात आहे अशी भावना निर्माण होत होती. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीने व्यापक चळवळ उभी केली. ती चळवळ दडपण्याचे प्रयत्न झाले. त्यावेळी झालेल्या गोळीबारात ११६ लोक हुतात्मा झाले. जालियनवाला बागेच्या हत्याकांडाशी या घटनेची तुलना केली जाऊ लागली.

भाषिक राज्याचा स्वाभाविक सर्वमान्य नि पुरातन हक्क डावलला गेला. याशिवाय असेंब्लीत व पार्लमेंटमध्ये आपले म्हणणे प्रमाणिकपणाने मांडण्यास काँग्रेस सभासदाना प्रतिबंध घालण्यात आला. त्यामुळे काँग्रेस संघटनेत विषण्णता निर्माण झाली.[९]

निवडणूकीच्या वेळी काँग्रेस नेत्यांनी ओढून-ताणून बळ आणले. पण त्यांचे मन त्यांना खात होते. त्यांची कुंचबना झाली. चळवळीची प्रखरता लोकशाहीला सोडून असलेले काँग्रेसजनावरील दडपण, त्यामुळे १९५७ च्या निवडणूकीत महाराष्ट्रात काँग्रेसला पराभव स्वीकारावा लागला. काँग्रेसचे मध्यवर्ती सरकारमधील मंत्री धोक्यात आले. अनुभवी व नामांकित लोक पडले असे असले तरी मात्र सोलापूर जिल्हयात काँगेसला चांगले यश मिळाले होते. या यशाबाबत कडवट टीका करताना आनंदवृत्त कल्पतरु म्हणते की, "पंढरपूर, माळशिरस तालुके सोडून बाकीचे तालुके म्हैसुर राज्यात बेळगाव आदि तालुक्याच्या मोबदल्यात जाण्यास तयार असल्याचा दिलासा सोलापूर जिल्हयाने नेहरु सरकारला दिला असावा ? का भाषिक वादाचे वा मुंबई नि मुंबईतील दंगलीचे आपल्याला काहीच सोयरसुतक नाही हे त्यास म्हणावयाचे आहे ? का याशिवाय आणखी काही अर्थ काढावयाचा आहे ? ते कळत नाही ?"[१०]

## संदर्भ टीपा

१. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. ६ जानेवारी १९५२.
२. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. ६ जानेवारी १९५२.
३. कामतकर व्यंकटेश, शिल्पकार स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्रथम आवृत्ती फेब्रुवारी २००५, पृ.क्र. ७५.
४. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. ६ जानेवारी १९५२.
५. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. १९ जानेवारी १९५२.
६. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. १९ जानेवारी १९५२
७. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. ९ फेब्रुवारी १९५७.

८. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. ९ फेब्रुवारी १९५७.
९. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. १६ मार्च १९५७.
१०. साप्ताहिक, कल्पतरु आणि आनंदवृत्त, दि. १६ मार्च १९५७.